प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे या कार्यालयासाठी बावधन, जि.पुणे येथील सर्व्हे नं.५०,५२ आणि ५३/ब/१ पैकी १९७२ चौ.मी. जागेची रक्कम अदा करण्यासाठी येणा-या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

परिवहन विभाग

शासन निर्णय क्रमांकः एमव्हीडी-०५२६/प्र.क्र. २०३/परि-४

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२

दिनांक :- २१ जुलै, २०२६

<u>वाचा</u> :- परिवहन आयुक्त, मुंबई यांचे पत्र क्र. पआका /कार्या-१० /बावधन / पुणे / २०२५ / जा.क्र.१२३३५, दि.०७.१०.२०२५.

<u>प्रस्तावना :-</u>

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे या कार्यालयात वाहने लावण्यास, नागरीकांना सुविधा देण्यास, अभिलेखांचे जतन करण्यास, शिकाऊ अनुज्ञप्ती चाचणीसाठी जागा अपुरी पडत आहे. पुणे शहरातील वाढती वाहनांची संख्या, गर्दी व केंद्रीकरणामुळे नागरिकांना व्यवस्थित व परिणामकारक सेवा देणे कठीण होते. तसेच सार्वजनिक सुविधा उदा. शौचालय, पिण्यायोग्य पाणी, पार्किंग यंत्रणा इ. अत्यंत अपूरी ठरते. त्यामुळे नागरीकांची गैरसोय होते. या सर्व बाबींचा विचार करता भविष्यात वाहन संख्येत व अनुज्ञप्ती धारकांच्या संख्येत होणारी वाढ विचारात घेता या कार्यालयासाठी शहरालगत पुरेशा जागेची आवश्यकता आहे. यानुषंगाने परिवहन आयुक्त यांच्या उपरोक्त वाचा येथील दि.०७.१०.२०२५ च्या पत्रान्वये प्राप्त प्रस्तावास अनुसरून प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे या कार्यालयाकरिता मौजे बावधन खुर्द, जि.पुणे येथील सं.नं. ५३/१३/ब/१ या मिळकतीपैकी आर.टी.ओ.-१ करिता आरक्षित क्षेत्रापैकी १९७२.०० चौ. मी. क्षेत्राचे भूसंपादित मुल्य रू.१४,३८,३७,६८०/- इतकी रक्कम मालमत्ता व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका या कार्यालयाकडे जमा करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे या कार्यालयाकरिता मौजे बावधन खुर्द, जि.पुणे येथील सं.नं. ५३/१३/ब/१ या मिळकतीपैकी आर.टी.ओ.-१ करिता आरक्षित क्षेत्रापैकी १९७२.०० चौ. मी. क्षेत्राचे भूसंपादित मुल्य रूपये - १४,३८,३७,६८०/-(अक्षरी रुपये चौदा कोटी अडतीस लाख सदतीस हजार सहाशे ऐंशी फक्त) इतकी रक्कम मालमत्ता व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका या कार्यालयाकडे जमा करण्यास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

तसेच, सदर जागेबाबत मालमत्ता व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका या कार्यालयासोबत करारनामा करण्याची कार्यवाही परिवहन आयुक्त यांनी करावी.

२. सदर बाबीकरिता येणारा खर्च मागणी क्र.बी-१०, मुख्य लेखाशिर्ष ४०७० इतर प्रशासनिक सेवांवरील भांडवली खर्च (००) ८०० इतर खर्च, (००)(००)(०४) परिवहन कार्यालयासाठी भूसंपादन (योजनातंर्गत) (दत्तमत) (४०७००११३) ५०- इतर खर्च या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२७ या अर्थिक वर्षाकरीता मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

३. सदर शासन निर्णय वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८ भाग पहिला, उप विभाग तीन, अनुक्रमांक ४, नियम क्रमांक २७ (२) अन्वये प्रशासनिक विभागास असलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७२११२३२४५९१३९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUNIL BABURAO APATE

Digitally signed by SUNIL BABURAO APATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Home Department, 2.5.4.20=19FF433C24F38AC95F09EAA0A14F560224A1A78A80F8B940775FC013021CA5CA, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4EA86DEC92091A126823D249DF451DF3C8D235CDD7E9111D7624C78A7C95B318, cn=SUNIL BABURAO APATE
Date: 2026.07.21 12:33:39 +05'30'

(सु.बा.आपटे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:-

१) मा.राज्यपाल यांचे सचिव.
२) मा.मंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव.
३) मा. राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव.
४) अपर मुख्य सचिव (परिवहन) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
५) महालेखापाल (लेखापरीक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, १/२, मुंबई /नागपूर.
६) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
७) सह परिवहन आयुक्त (प्रशासन/निरीक्षण), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई.
८) परिवहन उप आयुक्त (लेखा), परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई.
९) प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे.
१०) जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
११) अवर सचिव/कक्ष अधिकारी (बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
१२) निवडनस्ती (परि-४).